<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २४३/२०२१</u>
<u>(गगाराम धोंडी नांगरे वि. ग्रामविकास अधिकारी नागांव वगैरे ६)</u>
<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>
<u>सी.एन.आर.क्र. MHK0110024932021</u>

०१. सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ सह कलम १५१ अन्वये प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

<u>वादी यांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे,</u>

०२. वादी यांच्या कथनाप्रमाणे, जिल्हा कोल्हापूर, पोट तुकडी हातकणंगले पैकी वडगांव गांवचे हद्दीतील गांवठाणातील नगर भुमापन क्र. १०१७ क्षेत्र १७२ चौ.मी. या मिळकतीमधील आर.सी.सी. बांधकामाचे समाज मंदीर व उर्वरीत रिकामी जागा (परिच्छेद क्र. १, १अ व १ब मध्ये वर्णन केलेप्रमाणे) चतुःसीमांकीत मिळकत हा दाव्याचा विषय आहे. सदर दावा मिळकतीस येथून पुढे संक्षेपाकरिता ***"दावा मिळकत"*** असे संबोधणेत आले आहे.

०३. वादी पुढे कथन करतात की, नागांव येथील नगर भुमापन क्र. १०१७ दावा मिळकत व नगर भुमापन क्र. १०१६ या मिळकती मुळच्या चंद्राप्पा सुबराव यादव यांच्या मालकीच्या होत्या. त्यांच्याकडून या मिळकती वादी यांचे वडील धोंडी व चुलते बाबू बाळा नांगरे यांनी रक्कम ₹२,०००/- ला खरेदी घेतलेल्या आहेत. त्यापैकी नगर भुमापन क्र. १०१६ ही मिळकत वादीचे चुलते बाबू बाळा नांगरे यांना भाऊ हिस्सेने वाटून दिलेली आहे. तर नगर भुमापन क्र. १०१७ ही वादी यांचे वडील मयत धोंडी नांगरे यांचे हिस्सेस वाटून आलेली आहे. त्याप्रमाणे सदर नोंदी सन १९७८ मध्ये नागांव गांवी झालेल्या प्रथम नगर भुमापन रेकॉर्डचे चौकशी रजिस्टरला दिसून येतात. त्यामुळे दावा मिळकत नगर भुमापन क्र. १०१७ ही वादीचे वडीलार्जीत

मालकी वहिवाटीची मिळकत आहे.

०४. वादी पुढे कथन करतात की, वादी यांचे वडील धोंडी बाळा नांगरे मयत झाले व त्यांचे पश्चात दोन मुले अनुक्रमे तुकाराम व गंगाराम या दोन्ही भावंडाचे दरम्यान वडीलार्जीत मिळकती अनुक्रमे नगर भुमापन क्र. ९९४, ९९५ व खरेदी घेतलेली नगर भुमापन क्र. १०१७ या तीन मिळकतींचे नोंदणीकृत वाटणीपत्र दिनांक ०७/०६/२००३ रोजी झाले असून नगर भुमापन क्र. १०१७ ची संपूर्ण मिळकत वादी यांना वाटून आली तर वडीलार्जीत नगर भुमापन क्र. ९९४, ९९५ या दोन घर मिळकतीमधील हिस्सा वादीचे भाऊ तुकाराम यांना वाटून दिलेला आहे. तसेच त्याप्रमाणे फेरफार क्र. २१७ हा नोंदविण्यात आलेला आहे.

०५. वादी पुढे कथन करतात की, त्यानंतर वादी यांना काही रकमेची आवश्यकता असल्याने त्यांनी नगर भुमापन क्र. ११७ मधील संपूर्ण क्षेत्र १७२ चौ.मी. तारणगहाण ठेवून दि. कोल्हापूर मराठा को–ऑप. बँक लि., शाखा शिरोली यांचेकडून रक्कम ₹७०,०००/– चे कर्ज घेतले व तशी नोंद फेरफार क्र. २२४ ने दावा मिळकतीचे उता–यावर दिसून येत आहे.

०६. वादी पुढे कथन करतात की, सुमारे ३५ ते ४० वर्षापूर्वी नागांव येथील समस्त मातंग समाजाचे लोकांना एकत्र बसणे, उठणेसाठी अशी कोणतीही इमारत नव्हती. त्यावेळी समाज कल्याण खाते, जिल्हापरिषद, कोल्हापूर व महाराष्ट्र शासनामार्फत निधी उपलब्ध झालेने तसे समाजमंदीर वादी यांचे जागेमध्ये बांधणेचा प्रस्ताव मातंग समाजातील लोकांकडून व गावचे प्रतिष्ठीत लोकांकडून आल्याने वादी यांनी आपली मालकी अबाधीत ठेऊन त्यास तोंडी संमती दिली. तसेच वादी यांनी सदर जागेमध्ये कुटुंबासह राहणेची अट घातली व त्यास सर्वांनी मान्यता दिली. वादी हे गेली ३५ ते ४० वर्ष त्यांचे कुटुंबासह दावा मिळकत १अ मधील समाज मंदिरात

रहात आहेत. त्याची कल्पना प्रतिवादी व गावचे संबंधीत लोकांना होती.

०७. वादी पुढे कथन करतात की, दावा मिळकत १अ व ब म्हणजेच नगर भुमापन क्र. १०१७ चे मालकी व वहिवाटीशी यातील प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचा काडीमात्र संबंध नव्हता व नाही. तरी देखील प्रतिवादी हे शिरोली पोलीसांना हाताशी धरून वादी यांचे विरुध्द वेगवेगळ्या प्रकारच्या खोट्या नाट्या तक्रारीचे अर्ज देत आहेत. तेव्हा वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दिनांक १४/०६/२०२१ रोजी रितसर अर्ज देऊन प्रतिवादी क्र. १ व २ यांचा वाद मिळकतीशी काही हक्कसंबंध असलेस त्यांनी त्याच्या नकला वादी यांना देणेबाबत कळविले होते. तथापी आजअखेर प्रतिवादी क्र. १ व २ यांचेकडून वादी यांना काहीही कळविले गेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही हक्क संबंध नाही हेच दिसून येते.

०८. वादी पुढे कथन करतात की, वादी यांचे नावाची नोंद ग्रामपंचायतीकडील मालमत्तापत्रकला मालक व भोगवटदार सदरी झालेली आहे. तथापी दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांचे दरम्यान वाद झाल्याने प्रतिवादी क्र. १ व २ वादी यांना मिळकतपत्रकाचा उतारा देण्यास टाळाटाळ करत आहेत. यापूर्वी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नागांव येथील मातंग समाजातील लोकांना उठवून बसवून वादी यांचे दावा मिळकतीमधील वहिवाटीस हरकत केल्याने वादी यांनी त्याबाबत जयसिंग केरबा यादव वगैरे ३ यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिरोली पोलीस ठाणेमध्ये तक्रार दिलेली आहे.

०९. वादी पुढे कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ व २ यांचा दावा मिळकतीशी काहीही हक्क संबंध नसताना त्यांनी दिनांक २३/१२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांना उठवून बसवून दावा मिळकत १अ

मध्ये त्यांना अनाधिकाराने प्रवेश करणेस लावला व वादी यांचे दावा मिळकत १अ मधील प्रापंचिक साहित्य समाज मंदीराचे बाहेर टाकून दिले व वादी व त्यांचे कुटुंबियांना अंगबळाचे जोरावर हुसकावून लावले व समाज मंदीरास कुलूप लावले. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस अडथळा केला असल्याने वादी यांचा संपूर्ण प्रपंच उघड्यावर पडलेला आहे. त्याबाबत वादी यांनी दिनांक २३/१२/२०२१ रोजी घटनेबाबत जरूर ती तक्रार मा. जिल्हा पोलीस प्रमुख, कोल्हापूर यांचेकडे दिलेली आहे.

१०. वादी पुढे कथन करतात की, वादी यांच्या मुलांची लग्ने झालेली असून त्यांना समाज मंदीराची जागा ही अपूरी पडत आहे. त्यामुळे त्यांनी दावा मिळकत १ब मध्ये नव्याने साधे शेड बांधणेचे ठरविले. दिनांक २५/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता शेड उभा करणेकरिता खड्डे काढणेस वादी गेले असता त्यांना प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी शेड उभे करणेचे नाही, जागा समाजाची आहे असे बोलून त्यांना परत पाठविले. त्यामुळे दावा मिळकत १अ मधील समाईक वहिवाटीस व दावा मिळकत १ब मधील शेडचे बांधकामास कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई मिळणेकरिता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

११. प्रतिवादी क्र. १ व २ दाव्यात हजर झाले व त्यांनी प्रस्तुत अर्जास सविस्तर म्हणणे निशाणी १७ कडे दिले व प्रस्तुत अर्जास तिव्र विरोध केला. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कथनाप्रमाणे वादी यांनी मातंग समाज मंदीरच्या संबंधीत सर्व लोकांना पक्षकार केलेले नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ च २ यांचे विरुध्द दावा दाखल करत असताना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम १८० प्रमाणे त्यांचे विरुध्द दावा दाखल करणेपूर्वी नोटीस देणे बंधनकार आहे. तशी नोटीस वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना दिलेली नाही. वादी यांनी वस्तुस्थिती लपवून सदरचा दावा दाखल केलेला आहे.

१२. प्रतिवादी क्र. १ व २ पुढे कथन करतात की, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. १७४/१९८१ दिनांक २९/०१/१९८१ रोजी खरेदी घेतलेली मिळकत असून मातंग समाज तर्फे व्यक्ती ग्रामपंचायत ठराव क्र. ११९ दिनांक १५/०२/१९८३ रोजी श्री. तातोबा गुंडा यादव यांचे नावाची नोंद ग्रामपंचायत मिळकतीचे मालमत्ता पत्रकाला झालेली आहे. वादी यांचे म्हणण्याप्रमाणे त्यांचे पूर्वहक्कदार चंद्राप्पा सुबराव यादव यांचेकडून कोणत्याही नोंदणीकृत खरेदीपत्रानुसार सदरच्या मिळकती खरेदी केलेल्या नाहीत. वादी यांचे चुलते बाबू बाळू नांगरे यांचेकडून त्यांचे कब्जे व वहिवाटीनुसार व नमुद चतुःसीमेप्रमाणे मातंग समाजातील लोकांनी सदरची मिळकत खरेदी केलेने त्यांचे नावाची नोंद ग्रामपंचायत उता-यास फरफारनुसार नोंद झालेली असून सदरची मिळकत ग्रामपंचायत मौजे नांगाव यांना देखभालीसाठी देण्यात आली आहे.

१३. प्रतिवादी क्र. १ व २ पुढे कथन करतात की, दावा मिळकत नगर भुमापन क्र. १०१७ ही मातंग समाज मंदिरासाठी बांधकाम केलेली आहे हे माहित असताना देखील ग्रामपंचायतीला अंधारात ठेवून वादी यांनी परस्पर दावा मिळकत खोट्या, चुकीच्या व बनावट वाटपाद्वारे स्वतःच्य नांवे लावून घेऊन त्यांनी खोटी व चुकीची पोकळ नोंद भूमापन कार्यालयात करून घेतली आहे. वादी यांनी सदर वाटपाप्रमाणे शासनाची फसवणूक केली आहे. तसेच वादी यांनी तारण गहाण दिलेबाबत कोणताही कागद ग्रामपंचायत कार्यालयात हजर केलेला नाही तसेच वादी यांनी तारण गहाण केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता सदरचा तारण गहाण दस्त हा वादीचेच नगर भुमापन क्र. १०१६ चा असल्याचे दिसून येते.

१४. प्रतिवादी क्र. १ व २ पुढे कथन करतात की, त्यांनी ग्रामपंचायत नागांव यांच्या सहकार्यातून व मा. आमदार जयवंतरावजी आवळे यांच्या स्थानिक फंडातून सदर मिळकतीवर समजार मंदीर उभारलेले आहे. तसेच मे २०२१ मध्ये सदर

इमारतीची दुरूस्ती ग्रामपंचायत ठराव क्र. ४८-०६/०१/२०१९ ने समाजाचे कार्यासाठी (Public Utility) उपलब्ध करुन दिलेली आहे. समाज मंदिराचे बांधकामाचा पूर्ण खर्च हा सार्वजनिक बांधकाम खाते यांनी त्यांचे तांत्रिक मान्यत आदेश दिनांक २६/०८/२०१९ च्या आदेशान्वये १४ व्या वित्त आयोगाच्या सन २०१९-२०२० नुसार केलेला आहे. त्यावेळी वादी यांची कोणतीही वहिवाट दावा मिळकतीमध्ये नव्हती.

१५. प्रतिवादी क्र. १ व २ पुढे कथन करतात की, प्रतिवादी क्र. ३ ते ६ व मातंग समाजातील संपूर्ण लोक यांचीच सदर मिळकतीच्या ठिकाणी कब्जे वहिवाट आहे. उलट वादी हे दावा मिळकतीच्या पूर्वेस नगर भुमापन क्र. १०१६ मध्ये स्वतःचे कौलारू घरात कुटुंबासह राहण्यास आहेत. दावा मिळकत ही सार्वजनिक मातंग समाजाच्या उपयोगाची असल्याने त्याचा कोणताही घरफाळा आकारला जात नाही. दावा मिळकतीमध्ये ग्रामपंचायत, नागांव तर्फे समाज उपयोगी असे सार्वजनिक उपक्रम राबविले जातात. वादी हे कपट बुध्दीने वारंवार प्रतिवादी क्र. १ व २ यांचे बरोबर समाजातील इतर लोकांविरुध्द खोट्या नाट्या तक्रारी करुन समाज मंदीरच्या कामामध्ये अडथळा निर्माण करित आहेत. वादी यांनी समाज मंदीर हे सर्वांसाठी खुले असलेला गैरफायदा घेतलेला आहे. वादी ज्यावेळी अतिक्रमण करित आहेत हे समाजाला कळून आले त्यावेळी त्यांनी वादी यांना जाब विचारला असता वादी यांनी स्वतःहून आपले साहित्य समाज मंदीरबाहेर ठेवून त्याचे सुध्दा फोटो काढलेले आहेत. तसेच मंदिराबाहेर ग्रामपंचायतीने लावलेला ग्रेनाईट मार्बलमध्ये सन १९९३-९४ चा उदघाटन फलक देखील तोडून समाजाची विटंबना केली आहे.

१६. प्रतिवादी क्र. १ व २ पुढे कथन करतात की, त्यांनी वादी व मातंग समाज मंदीर यांची मोजणी करून घेतलेली असून सदर मोजणीमध्ये मातंग समाज मंदीरचे पूर्ण क्षेत्र व वादीचे क्षेत्र सुध्दा अस्तित्वात असलेचे दिसून येत आहे . वादी

अर्जामध्ये नमुद करतात त्याप्रमाणे कोणतीही घटना कधीही घडलेली नाही. समाज मंदिराची विटंबना होऊ नये म्हणून गावातील सर्व प्रतिष्ठीत लोकांनी शिरोली एम.आय.डी.सी. पोलीसांना तातडीने दखल घेणेस सांगितले असता पोलीसांनी वादी यांना कोणतेही गैरकृत्य करू नये म्हणून ताकीद दिलेली आहे. दावा मिळकत ही ग्रामपंचायत यांचे निगराणीखाली असल्याने सदर मिळकतीवर वादी यांना कोणतेही तात्परते शेड उभारण्याचा हक्क व अधिकार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

१७. प्रतिवादी क्र. ३ ते ६ दाव्यात हजर झाले व त्यांनी प्रस्तुत अर्जास सविस्तर म्हणणे निशाणी १८ कडे दिले. प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी सदरच्या अंतरिम अर्जास तिव्र विरोध दर्शविला. प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत ही मुळची बाबू बाळा नांगरे यांचे मालकी वहिवाटीची होती. त्याप्रमाणे त्यांचे नावाची नोंद ग्रामपंचायत मिळकत क्र. ५३४ ला झालेली होती. नागांव गांवचा सिटी सर्व्हे हा सन १९७८ ला सुरू झाला व सदर सिटी सर्व्हेची प्रोसेस ही सन १९८१ पर्यंत सुरू होती. बाबू नांगरे हे वादी यांचे नात्याने चुलते आहेत. दावा मिळकत बाळू बाबू बाळा नांगरे यांचेकडून भिकू देवाप्पा कांबळे यांनी दिनांक ०६/१२/१९८० रोजी नोंदणीकृत दस्त क्र. १९२८/१९८० अन्वये योग्य व वाजवी किमतीस खरेदी केली होती. त्यानंतर भिकू देवाप्पा कांबळे यांचेकडून दावा मिळकत ही समस्त मातंग समाज, नागांव तर्फे तातोबा गुंडा यादव वगैरे ४ इसमांनी दिनांक २९/०१/१९८१ रोजी दस्त क्र. १९२८/८० अन्वये खरेदी घेतली असून खरेदीपत्राचे वेळी दावा मिळकतीचा कब्जा मातंग समाजास दिलेला आहे. सदर खरेदीपत्रावेळी सिटी सर्व्हेचे काम सुरू असल्यामुळे सदर दावा मिळकतीचे मालमत्तापत्रकी मातंग समाजाचे नांवाची नोंद होऊ शकलेली नाही.

१८. प्रतिवादी क्र. ३ ते ६ पुढे कथन करतात की, दावा मिळकत ही मातंग

समाजाने खरेदी घेतल्यानंतर शासकीय मदतीने आमदर फंडातून व ग्रामपंचायत यांचे निधीतून सदर मिळकतीवर सन १९८१ साली म्हणजे सुमारे ४० वर्षापूर्वी समाज मंदीर बांधलेले आहे. वादी यांन चुकीच्या माहिती आधारे दावा मिळकतीचे मालमत्तापत्रकी स्वतःचे नावाची पोकळ नोंद करुन घेतली आहे. दावा मिळकत ही दिनांक २९/०१/१९८१ पासून मातंग समाज यांचे ताब्यात आहे. दावा मिळकतीमध्ये मातंग समाजाची वहिवाट असून सदर समाज दावा मिळकतीची देखभाल व देखरेख शांततामय पध्दतीने करित आहे. वादी यांनी दावा मिळकतीचे मालमत्तापत्रकी असलेल्या पोकळ नोंदीचा गैरफायदा घेणेच्या हेतूने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे.

१९. प्रतिवादी क्र. ३ ते ६ पुढे कथन करतात की, वादी यांनी दिनांक २४/०९/२०१९ रोजी सरपंच/ ग्रामसेवक, नागांव यांना अर्ज देऊन नगर भुमापन क्र. १०१६ ची जागा कब्जे वहिवाटीनुसार समाजाने स्वतःचे नाववार करून देणेबाबत विनंती केली होती. सदरचा अर्ज ग्रामपंचायतीमध्ये प्राप्त झाल्यानंतर दिनांक २३/१२/२०१९ ग्रामपंचायतीने प्रस्तुतचा अर्ज महात्वा गांधी तंटामुक्त गांव समिती समोर ठेवून वादी व प्रतिवादी यांचेमध्ये तडजोड होऊन वादीचे राहते घराची जागा म्हणजेच नगर भुमापन क्र. १०१६ ही वादीचे नांवे करून देणेस सांगितले होते व समाज मंदीरचे डागडुजीचे व दुरूस्तीचे काम करणेचे ठरले होते. त्याप्रमाणे मातंग समाजाने आर.सी.सी. इमारतीचे काम पूर्ण केले आहे. सदर तडजोडीनुसार मातंग समाज, नागांव यांचेतर्फे दिनांक १२/०२/२०२० राजी मा. भुमी अभिलेख, हातकणंगले यांचेकडे खरेदीपत्र व वहिवाटीनुसार नगर भुमापन क्र. १०१७ चे मालमत्तापत्रकी मालक व कब्जेदार सदरी मातंग समाजाचे नावाची नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला होता. असे असताना वादी यांनी बेकायदेशीरपणे समाज मंदिरात कब्जा करणेचा प्रयत्न केला आहे. त्यास समाजातील लोकांनी वादी यांना विरोध केला

असता वादी यांनी समाजातील लोकांना शिवीगाळ व मारहाण केली. त्याबाबत तक्रार संबंधीत पोलीस ठाणे येथे झाली असता दोन्ही लोकांना समज देण्यात आली आहे. वादी हे पोकळ नोंदी आधारे दावा मिळकत व समाज मंदिरावर कब्जा करणेचा प्रयत्न करित आहेत. प्रस्तुत अर्जामध्ये वादी यांनी मागितलेल्या दादी ह्या पूर्णपणे बेकायदेशीर असल्याने त्याबाबत दाद मागणेचा वादी यांना अधिकार नाही. सबब, प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांनी प्रस्तुत वादी यांचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

२०. वादी यांची तुर्तातुर्त मनाई अर्जातील कथने व त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे पाहून खालील वादप्रश्न माझे निदर्शनास आले. वादी व प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकून मी खालील वादप्रश्नांचे त्याखाली दिलेल्या कारणांसहित निष्कर्ष नोंदवले आहेत.

अ.क्र.	वादप्रश्न	निष्कर्ष
१.	प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजूने आहे असे वादी शाबित करतात काय ?	**अंशतः होकारार्थी**
२.	न्यायाचा समतोल वादी यांचे बाजूने आहे असे वादी शाबित करतात काय ?	**अंशतः होकारार्थी**
३.	तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे काय ?	**अंशतः होकारार्थी**
४.	अंतिम आदेश काय ?	**अंतिम आदेशानुसार अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.**

का र ण मि मां सा

२१. सदरचे चारही वादप्रश्न एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याचे

विवेचनाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतलेले आहेत.

२२. दावा प्रलंबीत असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजूर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधिन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधिकार वापरताना मा. सर्वोच्च न्यायालय यांनी *Darpat Kumar and another Vs. Pralhad Singh and others (1992) 1 SCC 719* या न्यायनिर्णयामध्ये खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक आहेत असे मार्गदर्शन केले आहे.

(अ) वादीला सकृत दर्शनी बाजू आहे काय ?
(ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ?
(क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ?

२३. दाव्याकामी तुर्तातुर्त ताकीदीची दाद मागत असताना वादी यांनी त्यांची प्रथमदर्शनी बाजू शाबीत करणे गरजेचे आहे. वादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत नगर भुमापन क्र. १०१७ ही वादी यांची वडीलार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीमध्ये ३५ ते ४० वर्षापूर्वी नागांव येथे समस्थ मातंग समाजातील लोकांना उटने बसणेसाठी कोणतीही इमारत नव्हती. त्यावेळी समाज कल्याण खाते जिल्हा परिषद व महाराष्ट्र शासन यांच्या निधीने इमारत बांधण्याचे ठरविले व त्याबाबतचा प्रस्थाव वादी यांना आल्याने वादी यांचा मालकी हक्क आबाधीत ठेवून वादी यांनी दावा मिळकतीमध्ये इमारत बांधणेस संमती दर्शविली. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, परंतू सदर इमारतीमध्ये वादी यांनी कुटुंबासह राहणेची अट घातली व त्यास सर्व समाजाने मान्यता दिली. वादी पुढे युक्तीवाद करतात की, प्रस्तुत दाव्याकामी दावा मिळकत १अ हे नगर भुमापन क्र. १०१७ मध्ये समाज मंदीर असून सदर समाज मंदीरामध्ये वादी गेले ३५ ते ४० वर्षापासून रहात आहेत. त्यांनी पुढे युक्तीवाद करतात की, दावा मिळकत १अ समाज

मंदीर व दावा मिळकत १ब नगर भुमपन क्र. १०१७ चे मालकी वहीवाटीशी प्रतिवादी यांचा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही.

२४. याउलट प्रतिवादी १, २ व ३ ते ६ तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, नगर भुमापन योजनेवेळी वादी तसेच वादी यांचे चुलते बाबू बाळा नांगरे यांची नगर भुमापन क्र. १०१७ व १०१६ यास पोकळ व चुकीच्या स्वरूपाची नोंद झाली. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वास्तविक नगर भुमापन क्र. १०१७ मध्ये प्रत्यक्ष जागेवर बाबू नांगरे यांची वहिवाट असून वादी यांची वहिवाट नगर भुमापन क्र. १०१७ मध्ये नसून १०१६ मध्ये आहे व १०१६ मध्ये वादी यांचे राहते घर वगैरे आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, समाज मंदीर हे वादी यांचे जागेत कधीही बांधलेले नसून ते बाबू नांगरे यांचेकडून समाजाने दिनांक २९/०१/१९८१ रोजी नोंदणीकृत खरेदीपत्राने जागा खरेदी करून त्यामध्ये बांधलेले आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, सदर समाज मंदीरामध्ये वादी कधीही राहणेस नसून नगर भुमापन क्र. १०१६ या मिळकतीमध्ये वादी यांचे कौलारू घर असून सदर मिळकतीत वादी बरेच वर्षापासून राहतात.

२५. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी त्यांचे कथनांचे पुष्ट्यर्थ निशाणी क्र. ३/२ येथे नगर भुमापन क्र. १०१७ चा मालमत्तापत्रकाचा उतारा दाखल केला आहे. सदर उता-याचे अवलोकन केले असता सन १९७८ साली सदर मिळकतीस वादी यांचे वडील धोंडी बाळा नांगरे यांचे खरेदीने व भाऊ वाटपाने धारक सदरी नांव नोंद झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते व त्यानंतर सदर धोंडी बाळा नांगरे मयत झाल्यानंतर दिनांक ०५/०४/२००४ रोजी फेरफार क्र. १९८ ने वादी व त्यांचे भाऊ तुकाराम धोंडीबा नांगरे यांचे नावाची नोंद झाल्याचे स्पष्ट होते व त्यानंतर दिनांक ०७/०६/२००३ रोजी वादी व त्यांचे भाऊ तुकाराम धोंडीबा नांगरे यांचे दरम्यान वाटणीपत्र होऊन नगर भुमापन क्र. १०१७ चे धारक सदरी वादी यांचे

नावाची नोंद फेरफार क्र. २१७ ने झाली असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते व सन २००४ पासून आजतागायत सदर नगर भुमापन क्र. १०१७ या मिळकतीस वादी यांचे नावाची नोंद असल्याचे स्पष्ट होते. वादी यांनी निशाणी क्र. ३/३ येथे वादी व त्यांचे भाऊ तुकाराम नांगरे यांचे दरम्यान दिनांक ०७/०६/२००३ रोजी दावा मिळकत १०१७ व अन्य मिळकती नगर भुमापन क्र. ९९४ व ९९५ या मिळकतीदरम्यान झालेले नोंदणीकृत वाटपपत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. सदर वाटपपत्राचे अवलोकन केले असता सदर वाटपपत्रामधील मजकुरा नुसार दावा मिळकत क्र. १०१७ ही वादी यांच्या वाटपास आली असल्याचे स्पष्ट होते. वादी यांनी निशाणी क्र. ३/५ येथे परिरक्षक भुमापक यांचेकडील नमुना–९ चा उतारा दाखल केलेला असून फेरफार क्र. २१७ ने दिनांक १७/०६/२००४ रोजी नगर भुमापन क्र. १०१७ या संपूर्ण मिळकतीस वादी यांचे नावाची नोंद झाली असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते . वादीतर्फे निशाणी क्र. ३/६ ते ३/१० येथे नगर भुमापन क्र. १०१७ बाबतचे थकीत फाळ्याच्या रकमेबाबत व घरठाणपत्रक उता–याच्या मागणीबाबत त्यांनी गट विकास अधिकारी यांना तसेच तंटामुक्त समिती यांचेकडे केलेल्या तक्रारी अर्जाच्या स्थळप्रती दाखल केलेल्या आहेत. सदर तक्रारी अर्जाचा आधार घेऊन वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ व २ ग्रामपंचायत हे मुद्दामहून वादी यांना दावा मिळकतीमधील घरठाणपत्रकाचा उतारा देत नाहीत.

२६. प्रतिवादी तर्फे निशाणी क्र. २३/४ येथे मिळकत क्र. ३२४ब बाबतचे वादी यांचे चुलते बाबू बाळा नांगरे यांनी भिकू देवाप्पा नांगरे यांना करून दिलेले खरेदीपत्राची सही शिक्याची प्रत तर निशाणी क्र. २३/५ येथे सदर मिळकतीबाबत भिकू देवाप्पा नांगरे यांनी नागंव येथील मातंग समाज यांना करून दिलेले खरेदीपत्राची सही शिक्याची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे सदरचे समाज मंदीर हे वादी यांचे चुलते बाबू नांगरे यांचेकडून त्यांनी खरेदी केलेले असून त्यामध्ये

त्यांनी समाज मंदीर बांधलेले आहे. प्रतिवादी क्र. १ व २ ग्रामपंचायत, नागांव यांनी सदर समाज मंदीर बांधतेवेळी व बांधल्यानंतर त्याबाबत झालेल्या डागडुजीबाबतचे व दुरूस्तीबाबतचे निशाणी क्र. २१ सोबत ग्रामपंचायतीचे ठराव दाखल केलेले आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, वादी हे कधीही नागांव येथे मातंग समाज मंदीरामध्ये रहात नसून वादी यांचे नागांव येथे राहते घर आहे. सदर कथनाचे अनुषंगाने प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी या न्यायालयाचे लक्ष निशाणी क्र. २१/२ येथील ग्रामपंचायत, नागांव येथील सन २०१६ व २०१७ सालचे घरठाणपत्रक यादीकडे नेले. सदर घरठाणपत्रक यादीचे अवलोकन केले असता वादी यांचे नांवे नगर भुमापन क्र. ९९४ या मिळकतीमध्ये मिळकत क्र. ९९४/२ ही घर मिळकत असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. तसेच प्रतिवादीतर्फे वादी यांना सन २०१२ चे सर्व्हे यादी नुसार मंजूर झालेल्या शौच्छालयाबाबतचा अहवाल निशाणी क्र. २१/२२ येथे दाखल केलेला आहे.

२७. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी यांचे कथनाप्रमाणे नगर भुमापन क्र. १०१७ या मिळकतीमध्ये समाज मंदीर बांधणेसाठी त्यांनी मातंग समाजास तोंडी परवानगी दिली व वादी कुटुंबासह सदर समाज मंदीरामध्ये राहतील अशी अट घातली तसेच गेली २५ ते ३० वर्ष त्यांची सदर समज मंदीरामध्ये कब्जे वहिवाट आहे. परंतू वादी यांनी मातंग समाजास तोंडी संमती दिली हे दर्शविणेबाबत वादी यांचे वाद कथनाशिवाय कोणताही पुरावा प्रथमदर्शनी अभिलेखावर नाही. सदर संमती दिली हे शाबीत करण्यासाठी संमती देतेवेळी असलेल्या लोकांचे वादी शपथपत्र दाखल करू शकले असते. परंतू तशी कोणतीही शपथपत्रे अभिलेखावर नाहीत. त्याचबरोबर जर तशी तोंडी संमती दिली असती व वादी यांना सदर मिळमतीमध्ये राहण्याची परवानगी समाजातर्फे देण्यात आली असेल तर सदर समाज मंदीर बांधतेवेळी व नंतर सदर समाज मंदीराची डागडूजी व दुरूस्ती करतेवेळी झालेल्या

ग्रामपंचायतीच्या ठरावामध्ये अथवा मातंग समाज्याच्या ठरवामध्ये त्याबाबतचा उल्लेख येणे गरजेचे होते. परंतू प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेल्या निशाणी क्र. २१ सोबतच्या ग्रामपंचायतीच्या ठरावामध्ये तसेच मासिक सभांच्या प्रोसिडींगमध्ये कोठेही त्याबातचा उल्लेख आलेला नाही.

२८. वादीतर्फे यांची गेले २५ ते ३० वर्ष मातंग समाज मंदीरामध्ये कब्जे वहिवाट होती हे दर्शविण्याचे दृष्टीने निशाणी क्र. ३/१४, निशाणी क्र. २५/२ येथे तसेच निशाणी क्र. ३७/१ ते ५ येथे छायाचित्रे दाखल केलेली आहेत. सदर छायाचित्रांवरून वादीतर्फे ते दावा मिळकतीमध्ये रहावयास होते हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतू प्रथमदर्शनी तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा न्यायनिर्णय करित असता केवळ छायाचित्रांवर अवलंबून राहून वादी यांची समाज मंदीरामध्ये कब्जे वहिवाट होती हे मान्य करणे योग्य होणार नाही. जर वादी हे दावा मिळकतीमध्ये गेले २५ ते ३० वर्ष राहणेस असते तर गेले २५ ते ३० वर्षामधील विज बिल, पाणी कनेक्शन, शौच्छालय अनुदान, पाणीपट्टी इत्यादी अनुषंगीय पुरावा जो वादी हे मंदीरामध्ये वास्तव्यास आहेत हे दाखविण्यासाठी दाखल करणे गरजेचे आहे. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ग्रामपंचायत हे मुद्दामहून त्यांना नगर भुमापन क्र. १०१७ मध्ये घरठाणपत्रकाचा उतारा मागणी करून देखील देत नाहीत. परंतू दरम्यानच्या काळात वादी यांनी निशाणी क्र. ३२/१ येथे ग्रामपंचायतीने वादीकडे केलेल्या घरफाळा मागणीबाबत बिल दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये नगर भुमापन क्र. ९९४/२ व १०१७/२ असे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. याउलट प्रतिवादीतर्फे निशाणी क्र. ३४/१ व ३ येथे वादी यांनी नगर भुमापन क्र. १०१६ या मिळकतीमध्ये पाणी नळ कनेक्शन दिल्याबाबतचा दाखला व वादी यांचे असलेले राहते घर हे नगर भुमापन क्र. १०१६ या मिळकतीमध्ये असलेबाबतचा स्थळ पाणी दाखला दाखल केला आहे. तसेच वादी यांचे नागांव येथे

राहते घर आहे हे दर्शविणेसाठी प्रतिवादी तर्फे निशाणी क्र. २९/३ येथे वादी यांचे नांवचे विज बिल दाखल करण्यात आलेले आहे.

२९. अभिलेखावरील संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले. संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता नागांव या गावामध्ये वादी यांचे मातंग समाज मंदीर वगळता इतर ठिकाणी राहते घर आहे हे प्रथमदर्शनी अभिलेखावरील कागदपत्रांवरून स्पष्ट होते. वादी हे गेली २५ ते ३० वर्षापासून मातंग समाज मंदीरामध्ये राहणेस आहेत हे दर्शविण्याचे दृष्टीने वादी यांचे वादकथन व दाखल छायाचित्रे तसेच निशाणी क्र. १९ व २० येथे साक्षीदार रघुनाथ माळी व जयवंत कांबळे यांची शपथपत्रे तसेच निशाणी क्र. ३४/२ येथे घरठाणपत्रकाचा उतारा व निशाणी क्र. ३२/१ येथे कर मागणीबाबतचा हुकुम हा कागदोपत्री पुरावा आहे. परंतू घरठाणपत्रक उता–यावरून कब्जे वहिवाट शाबीत होत नाही. वादी यांनी मातंग समाजास नगर भुमापन क्र. १०१७ मध्ये समाज मंदीर बांधणेसाठी तोंडी संमती दिली व त्यामध्ये वादी यांना राहणेची अट घातली ही बाब प्रस्तुत दाव्याच्या पुराव्याअंती ठरणार आहे. सद्यस्थितीस प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता वादी यांचे कथनाप्रमाणे दिनांक २३/१२/२०२१ रोजी प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने प्रवेश करून वादी यांचे राहते घरातील प्रापंचिक साहित्य बाहेर काढून टाकले व वादी यांना दावा मिळकत १अ मातंग समाज मंदीरामधून बेदखल केले. वादी यांच्या सदर कथनांचे अवलोकन केले असता दावा मिळकत १अ मध्ये दिनांक २३/१२/२०२१ रोजी प्रतिवादींनी बेदखल केल्याचे वादी यांचे कथन आहे. याचाच अर्ज सद्यस्थितीत सदर समाज मंदीरामध्ये वादी यांचा कब्जा राहिलेला नाही हे स्पष्ट होते. प्रस्तुत अभिलेखाचे व अर्जाचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांना प्रतिवादी यांनी दावा मिळकत १अ मधून बेदखल केले असेल तर वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये त्यांचा कब्जा पूर्ववत करून

मागणेबाबतची तुर्तातुर्त अज्ञार्थी मनाई ताकीदीची दाद मागणे गरजेचे होते. परंतू प्रस्तुत अर्जान्वये वादी यांनी कब्जा पूर्ववत बाबतची अज्ञार्थी मनाईची दाद दावा मिळकत १अ बाबत मागितलेली नाही. प्रस्तुत अर्जान्वये दावा मिळकत १अ समाज मंदीराबाबत वादी यांनी त्यांचे कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करू नये अशी दाद मागितलेली आहे. वादी यांचेच कथनाप्रमाणे त्यांना दावा मिळकत १अ मधून प्रतिवादी यांनी बेदखल केले आहे. अशापरिस्थितीमध्ये जर वादी हे दावा मिळकत १अ चे कब्जे वहिवाटीत सद्यस्थितीस नसतील तर त्यांचा कब्जा तुर्तातुर्त मनाई ताकदीच्या आदेशाने Protect करता येणार नाही.

३०. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता दावा मिळकत १अ ही समाज मंदीर इमारत असल्याचे अभिलेखावरून स्पष्ट होते. समाज मंदीर कोणा एका व्यक्तीच्या मालकीचे नसून त्यामध्ये पूर्ण समाजाचे हितसंबंध असतात. सदरचे समाज मंदीर हे ग्रामपंचायत, नागांव यांचे नावे आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांच्याच नांवे सदरची मिळकत आहे असे देखील वादी यांचे कथन नाही. अशापरिस्थितीमध्ये दावा मिळकत १अ हे समाज मंदीर असून त्यामध्ये पूर्ण नागांव गावातील मातंग समाजाचे हितसंबंध असल्याने व वाद सदर समाज मंदीराबाबतचा असल्याने वादीतर्फे प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम ८ चे तरतुदींची पुर्तता करून दाखल करणे गरजेचे होते. तसेच प्रस्तुत दाव्याकामी नागांव गावातील संपूर्ण मातंग समाजास पक्षकार करणे गरजेचे होते. परंतू प्रथमदर्शनी दावा मिळकत १अ बाबत वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम ८ चे तरतुदींची पुर्तता केल्याचे स्पष्ट होत नाही.

३१. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता दावा मिळकत १अ समाज मंदीरामध्ये वादी गेली २५ ते ३० वर्ष राहणेस आहेत याबाबत तुर्तातुर्त ताकीद देणेइतपत तसेच प्रथमदर्शनी बाजू शाबीत होणेइतपत ठोस पुरावा अभिलेखावर नाही.

वादी यांनी मातंग समाजास दिलेल्या तोंडी संमतीबाबत वादी यांच्या वाद कथनाव्यतिरिक्त इतर कोणताही अनुषंगीय पुरावा अभिलेखावर नाही. वादी यांच्या कथनाप्रमाणे दिनांक २३/१२/२०२१ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी वादी यांचे समाज मंदीरातील प्रापंचिक साहित्य बाहेर काढून वादी यांना दावा मिळकत १अ समाज मंदीरातून बेदखल केले. वादी यांची समाज मंदीरातील गेले २५ ते ३० वर्षापासून कब्जा पूर्ववत करून देणेबाबत तुर्तातुर्त अज्ञार्थी मनाई ताकीदीची प्रस्तुत अर्जान्वये मागणी नाही. वादी यांना दावा मिळकत १अ मधून बेदखल केल्यामुळे सद्यस्थितीस वादी यांचा समाज मंदीरामध्ये कब्जा राहिलेला नाही हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अशापरिस्थितीमध्ये वादी यांनी दावा मिळकत १अ बाबत केलेली तुर्तातुर्त मनाई ताकीदीची मागणी मंजूर करता येणार नाही. त्याबाबत वादी यांनी त्यांची प्रथमदर्शनी बाजू शाबीत केलेली नाही असे हे न्यायालय अनुमान नोंदवित आहे.

३२. वादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकत १अ समाज मंदीर मधून त्यांना बेदखल केल्यानंतर नगर भुमापन क्र. १०१७ मधील उर्वरीत रिकामी जागा म्हणजेच दावा मिळकत १ब यामध्ये वादी हे दिनांक २५/१२/२०२१ रोजी शेडचे बांधकाम करत असता त्यासही प्रतिवादी यांनी हरकत व अडथळा केला.

३३. दावा मिळकत १ब ही मिळकत नगर भुमापन क्र. १०१७ मधील दावा मिळकत १अ समाज मंदीर व्यतिरिक्त मोकळी जागा आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकत नगर भुमापन क्र. १०१७ ही त्यांची वडीलार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत आहे. त्याअनुषंगाने त्यांनी निशाणी क्र. ३/२ येथे नगर भुमापन क्र. १०१७ चा मालमत्तापत्रकाचा उतारा दाखल केला आहे. मालमत्तापत्रकी वादी यांचे वडील धोंडी बाळा नांगरे यांचे पश्चात वादी यांचे भाऊ तुकाराम व वादी यांचे नांव व त्यानंतर दिनांक १२/०७/२००४ रोजी वाटणीपत्राने वादी यांचे नावाची नोंद झाली असल्याचे स्पष्ट होते. सदरचे वाटणीपत्र निशाणी क्र. ३/३ येथे आहे. निशाणी क्र.

३/५ येथे त्याबाबतचा फेरफार क्र. २१७ चा उतारा दखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे नगर भुमापन योजनेवेळी नगर भुमापन क्र. १०१६ व १०१७ या मिळकतींना झालेल्या नोंदी या पोकळ स्वरूपाच्या आहेत. वास्तविक सदर नोंदीप्रमाणे वहिवाटी प्रत्यक्ष जागेवर अस्तित्वात नाहीत. परंतू संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता सदरच्या नोंदी जर पोकळ स्वरूपाच्या असतील तर सन १९७८ पासून आजतागायत त्या अव्हानीत करण्यात आल्या असत्या. परंतू सदरच्या नोंदी प्रतिवादी, वादी यांचे चुलते बाळू धोंडी नांगरे तसेच वादी यांचे भाऊ तुकाराम नांगरे यांनी अव्हानीत केल्या याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नाही.

३४. प्रतिवादीतर्फे नगर भुमापन क्र. १०१६ व १०१७ च्या नोंदी प्रमाणे वहिवाटी प्रत्यक्ष जागेवर अस्तित्वात नाहीत. याबाबत निशाणी क्र. २१/१९ व २१/२० येथे हात नकाशे दाखल केलेले आहेत. परंतू याउलट वादी यांनी निशाणी क्र. ३/४ येथे दाखल केलेला नगर भुमापन कार्यालयाकडील नगर भुमापन क्र. १०१६ व १०१७ चा नकाशा हा वादी यांनी दाव्यात नमुद केलेल्या दावा मिळकतीच्या वर्णनाप्रमाणे बरोबर असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. याउपर वादी व त्यांचे भाऊ तुकाराम यांचे दरम्यान दिनांक ०७/०६/२००३ रोजी झालेले दावा मिळकत व इतर मिळकतीसंबधीचे वाटणीत्र हे देखील आजतागायत अव्हानीत झालेले नाही.

३५. वादीतर्फे निशाणी क. ३/१ येथे नगर भुमापन योजने वेळीचा चौकशी नोंदवहीचा नकाशा दाखल करण्यात आलेला आहे. सदर नोंदवहीचे अवलोकन केले असता पूर्वी नगर भुमापन क्र. १०१७ चा क्रमांक ५९ असा होता व सदर मालमत्ता क्र. ५९ यास वादी यांचे वडील धोंडी बाळा नांगरे यांची वहिवाट होती असे त्यात नमुद आहे. तर नगर भुमापन क्र. १०१६ मध्ये बापू नांगरे यांचे नावाची नोंद होती असे स्पष्ट नमुद आहे व त्याप्रमाणेच बाबू बाळा नांगरे यांचे ताब्यात असलेल्या मिळकतीस नगर

भुमापन क्र. १०१६ व वादी यांचे वहिवाटीस असलेल्या मिळकतीस नगर भुमापन क्र. १०१७ देण्यात आला हे सदर नोंदवहिच्या उता–यावरून प्रथमदर्शनी स्पष्ट होते. सदर झालेल्या नगर भुमापन क्र. १०१७ च्या नोंदी सन १९७८ पसून आजतागायत अव्हानीत झालेल्या नाहीत. नगर भुमापन क्र. १०१७ यास वादी यांची असलेली नोंद ही सन २००४ सालापासून वादी यांचे वडीलांचे पश्चात आजतागायत गेली बरेच वर्ष आहे. ***अधिकार अभिलेखावरील नोंदी या जोपर्यंत विरुध्द कथने करणा–या व्यक्तीकडून खोडली जात नाहीत तोपर्यंत त्या नोंदी ख–या असल्याचे गृहितक आहे. (Entries in the record of the rights are having presumptive value unless contrary is proved).*** वादी यांचे नगर भुमापन क्र. १०१७ येथे झालेली नोंद ही पोकळ स्वरूपाची आहे याबाबत प्रतिवादीकडे कोणताही प्रथमदर्शनी ठोस पुरावा नाही. नगर भुमापन क्र. १०१७ व १०१६ च्या नोंदी प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर वहिवाटी नाहीत हे दर्शविण्याबाबत देखील प्रतिवादीकडे कोणताही ठोस पुरावा नाही. जर तशा वहिवाटी नसत्या तर आजतागायत त्याबाबत ग्रामपंचायत, इतर प्रतिवादी बाबू नांगरे इत्यादींनी नगर भुमापन कार्यालयाकडे कोणतीही तक्रार का केली नाही याचे कोणतेही संयुक्तीक कारण प्रतिवादी तर्फे देण्यात आलेले नाही.

३६. एकंदरीत संपूर्ण अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता जरी दावा मिळकत १अ समाज मंदीराबाबत वादी यांनी त्यांची प्रथमदर्शनी बाजू शाबीत केली नसली तसेच दावा मिळकत १अ बाबत वादी हे प्रथमदर्शनी अभिलेखावरील पुराव्यावरून तुर्तातुर्त ताकीद अर्जाची मागणी मिळणेस पात्र नसले तरी देखील दावा मिळकत १ब बाबत, वादी यांची दावा मिळकत १ब नगर भुमापन क्र. १०१७ मधील वादपत्रामध्ये नमुद केलेली १२२.६५ चौ.मी. क्षेत्राच्या मिळकतीबाबत त्यांची कब्जे वहिवाट प्रथमदर्शनी शाबीत केलेली आहे. वादी यांची नगर भुमापन क्र. १०१७ मध्ये गेली ब–याच वर्षापासून मालमत्तापत्रकी नोंद आहे. तसेच आजतागायत नगर भुमापन

क्र. १०१६ या मिळकतीस देखील वादी यांचे चुलते बाळू नांगरे यांचे नावाची नोंद आहे हे प्रथमदर्शनी निशाणी क्र. २७/१ येथील नगर भुमापन क्र. १०१६ चे उता–यावरून स्पष्ट होते. वादी यांची सदरची नोंद आजतागायत अव्हानीत केलेली नाही. वादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकत १ब मध्ये त्यांना शेड बांधणेस प्रतिवादी यांनी हरकत घेतली. सदरची बाब प्रतिवादी नाकारत नाहीत. वादी सदरची बाब शपथपत्राद्वारे कथन करतात. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी यांना प्रस्तुत दाव्याकामी arguable case दिसून येते. अशापरिस्थितीमध्ये वादी हे दावा मिळकत १ब बाबत प्रस्तुत अर्जात मागणी केले प्रमाणे निरंतर मनाईची दाद मिळणेस पात्र आहेत. त्याबाबत वादी यांनी त्यांची प्रथमदर्शनी बाजू शाबीत केली आहे. दावा मिळकत १ब बाबत सद्यस्थितीस न्यायाचा समतोल देखील वादी यांचे बाजूने आहे. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता दावा मिळकत १ब बाबत तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास प्रतिवादी पेक्षा वादी यांचेच जास्त नुकसान होणार आहे. ***सबब, वादप्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी नोंदवत असून वादप्रश्न क्रमांक ४ चे उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.***

आ दे श

१. वादी यांचा निशाणी क्रमांक ५ वरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. दाव्याच्या अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी व तर्फे इसमांनी दावा मिळकत १ब मधील वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही व कसल्याही प्रकारे हरकत व अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2022.03.25 16:51:30 +0530

पेठ–वडगांव. **(सी. एस. देशपांडे)**
दिनांक १९/०३/२०२२ **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**